मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 28 मे 2025 | पान- 1

# तुंबलेल्या नाल्यांची साफसफाई करा

## रस्त्यावरील खड्डे बुजवा : महापालिकेच्या जनसंवाद सभेत तक्रारींचा पाऊस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ७१ तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहे. नागरिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते.

त्यानुषंगाने अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद



सभा पार पडली. यावेळी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद नेमून दिलेल्या समन्वय अधिकारी यांनी भूषविले. आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ७, १३, ७, ९, २, १५, ४ आणि १४ अशा एकूण ७१ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

यावेळी नागरिकांनी पावसामुळे तुंबलेल्या नाल्यांची साफसफाई करणे, ठिकठिकाणी रस्त्यावर साचलेल्या पाण्याचा निचरा करणे, विविध ठिकाणी रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविणे, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करणे, पावसाचे पाणी घरात शिरू नये यासाठी रस्त्यांवर जलनिकासी व्यवस्था करणे, डासांचा प्रादुर्भाव वाढू नये याची काळजी घेणे, आवश्यक ठिकाणी किटकनाशक फवारणी करणे, रस्त्यांवरील बंद असलेले पथदिवे दुरूस्त करणे, रस्त्यांवर येणाऱ्या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे, सार्वजनिक वाहतूक थांब्यांवर पावसापासून बचाव व्हावा यासाठी उपाययोजना करणे आदी तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

---

# लोकांना विश्वासात घेऊनच विकास आराखड्याला अंतिम रूप


## नवीन प्रारूप शहर विकास आराखड्यावर नागरिकांच्या हरकती व सूचनांसाठी भव्य मेळावा संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रारूप विकास आराखड्यातील रस्ते व आरक्षणांच्या विरोधात नागरिकांच्या हरकती व सूचना जाणून घेण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी प्रेरणा शाळा मैदान, भोंडवे नगर येथे नुकताच भव्य मेळावा घेतला. नागरिकांनी आपल्या तक्रारी व आक्षेप स्पष्टपणे मांडले असता, आमदार शंकर जगताप यांनी "विकास आराखड्याची अंमलबजावणी करताना कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. सर्व नागरिकांना विश्वासात घेऊनच निर्णय घेतले जातील," अशी ग्वाही दिली.

महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यानुसार १२, १५ आणि २४ मीटर रुंदीचे रस्ते आरक्षित करण्यात आले आहेत. यामुळे अनेक नागरिकांच्या घरांवर थेट परिणाम होणार असून काहींना बेघरही व्हावे लागेल, अशी चिंता नागरिकांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर हरकती नोंदवण्यासाठी व आपले मुद्दे मांडण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या वेळी आमदार शंकर जगताप यांनी नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि स्पष्ट आश्वासन दिलं की, "मी प्रत्येक घर वाचवण्यासाठी तुमच्यासोबत आहे. कोणतीही योजना ही लोकांच्या हितासाठीच असावी लागते. जर कुठल्याही नागरिकावर अन्याय होत असेल, तर तो अन्याय थांबवण्यासाठी माझा पूर्ण पाठिंबा राहील."



या मेळाव्याचे संयोजन नीलेश भोंडवे, बिभीषण चौधरी, मनोज तोरडमल, नामदेव ढाके, सचिन चिंचवडे, शेखर चिंचवडे, नाना शिवले, धनंजय वाल्हेकर, सचिन शिवले, आदेश नवले, कविताताई दळवी, दीपक वाल्हेकर, प्रवीण वाल्हेकर, वाल्मिक शिवले, दत्ताभाऊ ढगे, तुषार वाल्हेकर, नीलेश वाल्हेकर, पाटीलबुवा चिंचवडे, खंडुदेव कथारे, चंद्रहास वाल्हेकर, अनिकेत क्षीरसागर यांच्यासह वाल्हेकरवाडीच्या नागरिकांनी संयुक्तपणे केले.

या मेळाव्याच्या माध्यमातून स्थानिकांनी आपल्या व्यथा, अडचणी व अपेक्षा थेट लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवल्या. आता या आक्षेपांच्या अनुषंगाने आमदार शंकर जगताप लोकाभिमुख निर्णय घेतील, असा विश्वास यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केला.

# राज्यातील पहिले ‘हेलिपोर्ट’ हडपसरला

## २३० एकर जागेवर राज्यातील पहिले हेलिपोर्ट उभारणार : राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

**पुणे | प्रतिनिधी**

‘राज्यातील पहिले ‘हेलिपोर्ट’ पुण्यातील हडपसर ग्लायडिंग केंद्राच्या जागेवर उभारण्यात येणार असून, या ठिकाणी जागतिक दर्जाची देशातील पहिली ‘एव्हिएशन गॅलरी’ साकारण्यात येणार आहे. लवकरच संबंधित २३० एकर जागेचा ताबा भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे हस्तांतरित होईल. त्यानंतर भविष्यकालीन हवाई उड्डाणांच्या दृष्टीने हेलिपोर्टसाठी सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार करण्यात येईल,’ अशी माहिती केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोमवारी दिली.

पश्चिम भागातील पर्यटन क्षेत्र, व्यवसाय आणि इतर कामानिमित्त पुण्यातून सर्वाधिक हेलिकॉप्टरची उड्डाणे सुरू असतात. त्याचा इतर हवाई उड्डाणांवर परिणाम होतो. त्यामुळे स्वतंत्र नियोजन आणि पायाभूत सुविधांनी विकसित हवाई उड्डाणांसाठी स्वतंत्र ‘हेलिपोर्ट’ तयार करण्यात येणार आहे. यामुळे हवाई उड्डाणांमध्ये सुधारणा करण्यात येईल.

हडपसर येथील ग्यायडिंग केंद्र २३० एकर क्षेत्रावर उभे आहे. सध्या ही मालमत्ता नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या ताब्यात आहे. गेल्या दशकापासून या केंद्राचा वापर प्रशिक्षणार्थी व विमानप्रेमींसाठी होत आहे. ग्लायडिंग सेंटरचा भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे ताबा आल्यानंतर या प्रकल्पाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल. हवाई विभाग आणि इतर विभागांकडून परवानगी मिळाल्यानंतर या प्रकल्पाची मुहूर्तमेढ होईल.

‘नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या कौशल्य विकास आणि माहिती-तंत्रज्ञान विभागाने ४ मार्च २०२२ रोजी या जागेचा व मालमत्तांचा ९९ वर्षांच्या कालावधीसाठी हस्तांतरण करण्याचा निर्णय घेतला. प्रतिवर्ष नाममात्र एक रुपया दराने ही जागा भारतीय विमानतळ प्राधिकरणाला देण्यात येणार आहे. त्यामुळे या भागातील विमान वाहतुकीच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठा बदल घडून आणण्यासाठी आणि हेलिकॉप्टर-आधारित सेवांना चालना देण्यासाठी हेलिपोर्ट उभारण्याचा मानस आहे,’ असे मोहोळ यांनी सांगितले.

मोहोळ म्हणाले, ‘हा प्रकल्प विचारात असून अद्याप कुठला प्रस्ताव बनविण्यात आलेला नाही. मात्र, या ठिकाणी हेलिपोर्ट बनल्यानंतर वैद्यकीय सेवांसह, पर्यटन, आपत्कालीन सेवा, व्यावसायिक प्रवास यासाठी उपयोगी ठरेल. भौगोलिकदृष्ट्या ही जागा महत्त्वाची असून नागरी विमान वाहतुकीच्या दृष्टीने एक महत्त्वाचे केंद्र ठरू शकते. पुणे जिल्ह्यात अशी दोन हेलिपोर्ट्स उभारण्याचा आमचा मानस आहे, एक हडपसर येथे, तर दुसऱ्या जागेबाबत शोध सुरू आहे.’

### जागतिक दर्जाची एव्हिएशन गॅलरी

» मोहोळ म्हणाले, ‘ग्लायडिंग सेंटरमध्ये जागतिक दर्जाची ‘एव्हिएशन गॅलरी’ उभारण्याचा मानस आहे. यामध्ये संग्रहालयाबरोबरच एक संवादात्मक, शैक्षणिक व अनुभवात्मक माहिती मिळेल. त्याला एक पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात येईल. या ठिकाणी भारताचे जागतिक विमानवाहतुकीतील योगदान अधोरेखित केले जाईल. या गॅलरीमध्ये जुन्या विमानांपासून आधुनिक विमानांचे शोध, सिम्युलेटर, ऐतिहासिक माहिती व डिजिटल प्रदर्शन समाविष्ट असेल. नागरी व लष्करी विमानवाहतुकीच्या अभ्यासासाठी ते फायद्याचे ठरेल.’

# ‘कोड ब्ल्यू’मुळे हजारो जणांना जीवदान!

## रोज ६ जणांवर आपत्कालीन उपचार : ससून रुग्णालयाच्या प्रशासनची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

ससून सर्वोपचार रुग्णालयात वैद्यकीय आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास उपचार करण्यासाठी ‘कोड ब्ल्यू’ यंत्रणा जुलै २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. ही यंत्रणा सुरू करणारे ससून हे राज्यातील पहिले सरकारी रुग्णालय ठरले होते. या यंत्रणेमुळे वैद्यकीय आपत्कालीन स्थितीत केवळ १२० सेकंदांत रुग्णाला उपचार मिळत असून, गेल्या दोन वर्षांत दररोज सुमारे सहा जणांना ही मदत मिळाली आहे.

ससूनमध्ये ‘कोड ब्ल्यू’ची सुरुवात १ जुलै २०२३ रोजी झाली. रुग्णालयात १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत ९७२ वेळा यंत्रणेचा वापर झाला. त्यानंतर २०२४ मध्ये या यंत्रणेचा २ हजार ४०२ वेळा वापर झाला. यावर्षी जानेवारी ते २३ मेदरम्यान १,०२२ वेळा या यंत्रणेचा वापर झाला. ससूनमध्ये ‘कोड ब्ल्यू’ सुरू झाल्यापासून जुलै २०२३ ते मे २०२५ या कालावधीत एकूण ४ हजार ३९६ रुग्णांवर आपत्कालीन स्थितीत उपचार झाले आहेत. त्यातील ५० टक्के रुग्ण श्वास घेण्यास त्रास होणारे आणि १५ टक्के रुग्ण हे हृदयक्रिया बंद पडलेले होते. या रुग्णांना वाचविण्यात यश आले. मात्र, आपत्कालीन उपचार करूनही ३० ते ३५ टक्के रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेले रुग्ण हे सहव्याधी आणि कर्करोगासह इतर गंभीर आजार असलेले होते, अशी माहिती ससून रुग्णालयाच्या प्रशासनाने दिली.

ससून रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात दररोज सुमारे तीन हजार रुग्ण येतात. त्यांच्यासमवेत त्यांचे नातेवाईक असतात. याचबरोबर रुग्णालयात दाखल रुग्ण आणि त्यांचेही नातेवाईक असतात. एखाद्याला हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यास अथवा श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्यास तातडीने उपचार करण्याची परिस्थिती उद्भवते. हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यास पहिले दहा मिनिटे हा सुवर्णकाळ मानला जातो. त्या कालावधीत उपचार झाल्यास रुग्ण वाचण्याची शक्यता जास्त असते. हाच विचार करून ससूनमध्ये ‘कोड ब्ल्यू’ यंत्रणा सुरू झाली. या यंत्रणेसाठी विशेष पथक तयार करण्यात आले असून, ते २४ तास उपलब्ध आहे. या पथकात डॉक्टर, भूलतज्ज्ञ, औषधशास्त्र तज्ज्ञ, परिचारिका आणि परिचरांचा समावेश आहे. डॉ. किरण जाधव हे ‘कोड ब्ल्यू’चे मुख्य समन्वयक असून, गौरव महापुरे हे समन्वयक आहेत.




### ‘कोड ब्ल्यू’ कशाप्रकारे काम करते...

» रुग्णालयात वैद्यकीय आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास ध्वनिक्षेपक यंत्रणेवरून उद्घोषणा.
» रुग्णालयातील कोणत्याही विभागातून सात क्रमांक डायल करून ‘कोड ब्ल्यू’ पथकाला पाचारण करण्याची सुविधा.
» कोड ब्ल्यू पथकाकडून १२० सेकंदांच्या आत संबंधित रुग्णाकडे धाव घेऊन त्याच्यावर तातडीचे उपचार.

# चऱ्होलीतील युवकांनी अवलंबली गांधीगिरी

## चऱ्होली आणि त्यांच्या बारा वाड्यामध्ये गेल्या दोन महिन्यापासून नगर रचना योजना जी प्रस्तावित केली आहे ती रद्द करण्यासाठी लढाई सुरु आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चऱ्होली ग्रामस्थांच्या सहनशीलतेचा अंत नेमका कोण पाहतंय ? महापालिका प्रशासन की राजकीय पदाधिकारी याबाबत चऱ्होली व त्यांच्या बारा वाड्यामध्ये चर्चेला ऊत आला आहे. दुसरी सर्वसाधारण सभा (जी बी ) आहे त्यामध्ये ही टी पी रद्द करण्याचा अद्यादेश सोडा सर्वसाधारण सभा (जी बी ) झाली नाही. त्यामुळे आता कोणाच्या नादाला न लागत आपले भविष्य सेक्युअर करण्यासाठी गावातील युवकांनी पुढाकार घेतल्याचे दिसत आहे. चऱ्होली व त्यांच्या बारा वाड्यातील युवक, युवक शेतकरी यांनी गांधीगिरीचा अवलंब सुरु केला आहे. सर्व प्रयत्न करून ही प्रशासक आपली मागणी मान्य करीत नसतील तर शांततेने आणि संयमाने आपली मागणी लावून धरत टी पी स्कीम रद्द करण्याचा अद्यादेश निघेपर्यंत गांधीगिरी चा मार्ग अवलंबण्यात चऱ्होलीतील युवकांनी पुढाकार घेतला आहे. त्याद्दष्टीने मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या प्रशाकीय मेलवर टी पी स्कीम रद्द करा असा विनंती अर्ज करून मेल करणे सुरु केले आहे.

चऱ्होली आणि त्यांच्या बारा वाड्यामध्ये गेल्या दोन महिन्यापासून नगर रचना योजना जी प्रस्तावित केली आहे ती रद्द करण्यासाठी प्रशासकीय आणि राजकीय स्तरावर लढाई सुरु आहे. त्यामध्ये सर्व पक्षाचे झेंडे बाजूला सारून गावकरी प्रथमच एकत्र आल्याचे दिसत आहे. १४२५ हेक्टर म्हणजे जवळपास पावणे चार ते चार हजार एकरवर ही स्कीम प्रस्तावित आहे. त्यामुळे शासनाने घालून दिलेले नियम लागू झाल्याने याठिकाणी सुरु असणाऱ्या विविध विकास कामावर त्याचा विपरीत परिणाम दिसून येत आहे. त्याचा अप्रत्यक्ष फटका हा गावकरी आणि नोकरी, व्यवसाय निमित्त याठिकाणी वास्तव्यात आले असलेल्या नागरिकांच्यावर होऊ लागला आहे. त्यामुळे महापालिकेच्या विरोधात वातावरण निर्माण होऊन ग्रामस्थांनी टी पी स्कीमला विरोध दर्शविला आहे. त्यासाठी वेळोवेळी महापालिका प्रशासक शेखर सिंह यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न केला.



### टी पी स्कीम रद्द करण्याच्या द्दष्टीने अद्यादेश काढा

» गावकऱ्यांच्या मधील असंतोष पाहता राजकीय व्यक्तींनी यामध्ये उडी घेतली. आमदार महेश लांडगे यांनी आयुक्तांना गांवकऱ्यांची भूमिका समजावण्याचा प्रत्यन केला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यामध्ये सहभागी करण्यात आले. सर्वांनी जनभावनेचा आदर करून टी पी स्कीम रद्द करण्याच्या द्दष्टीने अद्यादेश काढा असे आदेश दिले. त्याअनुषंगाने आयुक्तांनी सकारात्मक निर्णय होईल असे स्पष्ट केले होते.

### ...तोपर्यंत लढाई सोडायची नाही

» आयुक्त हे स्वतः मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या कर्यक्रमाच्या अनुषंगाने मुंबई येथे उपस्थित असल्याने नेमके आपल्याबरोबर कोण राजकारण करतंय याबाबत चऱ्होलीमध्ये चर्चा रंगली आहे.तरी ही आपण जोपर्यंत टी पी बाबत रद्द चा आद्यदेश निघत नाही तोपर्यंत लढाई सोडायची नाही असे ठरवून आता गावातील युवकांनी ही लढाई हातात घेतली आहे. जोपर्यंत आयुक्त आपली मागणी मेनी करणार नाहीत तोपर्यंत त्यांना आपल्या मागणीचे विनंती अर्ज त्यांच्या मेल आणि प्रशासनाच्या मेलवर पाठवीत राहण्याचे निश्चित केले असून त्याद्दष्टीने मंगळवार पासून सुरुवात केली आहे.

"आम्ही ज्ञानोबा , तुकोबांच्या विचाराचे पाईक आहे. शांततेने प्रश्न सोडविण्यावर आमचा भरोसा आहे. मंगळवारी आयुक्त मुंबई येथील कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी गेले होते. त्यांनी मी ही शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्यामुळे मला शेतकऱ्यांचे दुःख माहित आहे असा विश्वास व्यक्त केला होता. त्यामुळे आम्हाला विश्वास आहे की ते आमचा प्रश्न नक्की सोडवतील त्यामुळे आम्ही सध्या गांधीगिरीचा अवलंब केला आहे."

- हभप सतीश महाराज काळजे , स्थानिक

# रिंगरोडसाठी ३९ हेक्टर गटांच्या क्षेत्राची मोजणी पूर्ण; रिंगरोडसाठी भूसंपादनाच्या कामाला मिळणार गती

## अनधिकृत होर्डिंग आणि बांधकामांवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून धडक कारवाई करण्यात येत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वतीने होणाऱ्या रिंगरोडच्या भूसंपादन कामाला गती मिळणार आहे. पीएमआरडीएच्या हद्दीतून जाणाऱ्या रिंगरोडसाठी आवश्यक असलेल्या जमिनीची मोजणी पूर्ण झाली आहे. भूमी अभिलेख आणि उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय हवेली यांच्याकडून ३९ हेक्टर गटांच्या क्षेत्राची मोजणी केली आहे. मोजणीबाबतचे विवरणपत्र जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे पाठविले आहे. भूसंपादनासाठी पुढील कार्यवाही करण्यासाठी आणखी सुलभता येणार आहे.

पीएमआरडीएकडून विकसित करण्यात येणारा रिंगरोड हा एक महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी आणि इतर शहरांमधून पुण्यात येणारी अवजड वाहतूक वळविण्याच्या द्दष्टीकोनातून या रिंगरोडचे काम हाती घेण्यात आले आहे. रिंगरोड सोळू ते परंदवाडी या अंतरात केला जाणार आहे. एकूण ८२.३८ किलोमीटर अंतरात ६५ मीटर रुंदीचा हा रस्ता असणार आहे. रिंगरोड सुरुवातीला ११० मीटर रुंदीचा करण्यात येणार होता. मात्र, नागरिकांचा विरोध झाल्याने त्याची रुंदी ६५ मीटर निश्चित करण्यात आली आहे. रिंगरोडच्या पहिल्या टप्प्यात सोळू ते वडगाव शिंदे या सुमारे ५.४० किलोमीटर अंतरात काम केले जाणार आहे. खेड तालुक्यातील सोळू, वडगाव शिंदे आणि निरगुडी येथील जमिनीची मोजणी २०२४ मध्ये पुर्ण करण्यात आली आहे. तीनही ठिकाणची मिळून २८.२ हेक्टर गटाच्या क्षेत्राची मोजणी पुर्ण करण्यात आली आहे.

### हवेली तालुक्यातील झालेली मोजणी (हेक्टरमध्ये)

- » आंबेगाव खुर्द - १०.८२
- » भिलारेवाडी - १.६३
- » मांगडेवाडी - १५.९४
- » मांगडेवाडी - १५.९४
- » पिसोळी - ५.४६
- » वडाचीवाडी १.६४

रिंगरोडसाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भूसंपादन करण्यात येणार आहे. तयासाठी हवेली तालुक्यातील काही गावातील गटांच्या क्षेत्राची मोजणी पुर्ण केली आहे. मोजणीचे विवरणपत्र आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे दिले आहे. तयांच्या मार्फत पुढील कार्यवाही केली जाईल.

- आशा जाधव, अधिक्षक, भूमी अभिलेख. पीएमआरडीए.

# खेडमध्ये रंगले राजकीय हॉटवॉर

## राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार बाबाजी काळे यांच्यात अलीकड हॉटवॉर सुरु आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यात गेली काही दिवसांपासून राजकीय हॉटवॉर सुरू आहे. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, आमदार बाबाजी काळे यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये लोकसभा विधानसभा निवडणुकीपासुन सुरु झालेले गरम युद्ध (हॉट वॉर) संपता संपत नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार बाबाजी काळे यांच्यात अलीकड हॉटवॉर सुरू आहे. एकमेकांवर अगदी खालच्या पातळीवर टीका टिपण्णी आणि आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. पत्रकारपरिषदा घेऊन एकमेकांवर अगदी खालच्या पातळीवर टीका होत आहे. जणू काही यांचे वैयक्तिक भांडण आहे, असे एकेरी भाषेत एकमेकांवर राजकीय चिखलफेक सुरु आहे.

राजकारणात अजात शत्रू असतात मात्र ते इतक्या खालच्या पातळीवर टीका टिप्पणी करीत असतील असे वाटत नव्हते; परंतु खेडच्या राजकारणावरून हे चित्र समोर आले आहे. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी विधानसभेच्या निवडणुकीत आमदार बाबाजी काळे यांच्यावर प्रचार सभेत गंभीर आरोप केले. तसेच आरोप बाबाजी काळे आणि त्यांच्या सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनी देखील माजी आमदार मोहिते यांच्यावर केले. त्यावेळीही प्रचार सभेतून एकमेकांवर खालच्या पातळीवर चिखलफेक झाली. नंतर निवडणुकीचे निकाल आले दिलीप मोहिते पाटील यांना अपयश आले तर बाबाजी काळे आमदार झाले आणि नव नव्या वादाला पालवी फुटली.राजकीय धुळवड सुरू झाली. खेड तालुक्यात राजकीय हॉट वॉर सुरु झाले आहे. लोकप्रतिनिधी खालच्या पातळीवर राजकारण करीत असल्याने आणि एकमेकांवर चिखलफेक करीत असल्याने गाव पातळीवरच्या राजकारणावर त्याचा विपरीत परिणाम आगामी होणार आहे



### अधिकारी, कार्यकर्त्यांवर दबावाचा प्रयत्न

» मागील काही दिवसांपासून माजी आमदार विरुद्ध आजी आमदार थोडक्यात मोहिते विरुद्ध काळे यांचे राजकीय युद्ध सुरु झाले आहे. एकाला निवडणुकीतील हार पचत नाही तर दुसऱ्याला निवडून आल्याने ते हुरळून गेले आहेत, अशी सोशल मीडिया आणि नागरिकांमध्ये चर्चा आहे. प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय कार्यकर्त्यांवर दबाव आणण्याचा दोघांकडून प्रयत्न सुरू आहेत. कोणत्या ना कोणत्या कारणास्तव दोघांकडून एकमेकांवर घणाघात केला जात आहे.

### गावपातळीवरही परिणाम होणार

» खेड तालुक्यात राजकीय हॉट वॉर सुरु झाले आहे. लोकप्रतिनिधी खालच्या पातळीवर राजकारण करीत असल्याने आणि एकमेकांवर चिखलफेक करीत असल्याने गाव पातळीवरच्या राजकारणावर त्याचा विपरीत परिणाम आगामी होणार आहे. त्यातच काही दिवसातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक लागणार असल्याने त्यातही राजकीय हॉटवॉर होणार, असे चित्र सध्याच्या स्थितीवरून तालुक्यात दिसू लागले आहे.

### कोणाच्या दिव्याखाली अंधार

» माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी अनेक विकासकामे आणली आहेत. तालुका विकासाकडे नेण्याचे प्रयत्न केले. मात्र त्यांनी केलेल्या कामाचे श्रेय आमदार घेतात असे ते आणि त्यांचे कार्यकर्ते जाहीरपणे सांगतात. तर दुसरीकडे विकासकामे करताना त्यात अनियमितता आणि निकृष्ट केल्याचे सांगत विकासकामांबाबत मीच याबाबत पाठपुरावा केला व निधी आणला, भूमिपूजन, उद्घाटन आम्हीच करणार असे आमदार आणि त्याचे कार्यकर्ते सांगतात. यावर आरोप प्रत्यारोप सुरु आहेत, असे असले तरी मात्र तालुक्यातील जनता सुज्ञ आहे. कोणाच्या दिव्याखाली अंधार आहे हे मात्र ते जाणून आहेत.

# महाळुंगे इंगळेत ग्रामराजकारण तापू लागले

## गावातील विविध गटांकडून सरपंचपदासाठी जोरदार हालचाली सुरू , संभाव्य उमेदवारांची नावे पुढे येऊ लागली

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील महाळुंगे इंगळे ग्रामपंचायतीसाठी या वेळी होणाऱ्या निवडणुकीत सरपंचपद लोकनियुक्त असून ते सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित आहे. त्यामुळे गावातील विविध गटांकडून सरपंचपदासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. संभाव्य उमेदवारांची नावे पुढे येऊ लागली असून ग्रामराजकारण तापू लागले आहे.

श्रीक्षेत्र महाळुंगे तालुका खेड हे खेड तालुक्यातील राजकारणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे गाव मानले जाते याशिवाय या गावाच्या चारही बाजूला मोठी औद्योगिक वसाहत यामुळे खेड तालुक्यातील श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून महाळुंगे इंगळे ओळखले जाते.

गावात यापूर्वी सरपंच निवड बहुतेकवेळा अंतर्गत निवड प्रक्रियेमार्फत होत असे; मात्र डिसेंबर 2025मध्ये ग्रामपंचायतीसाठी प्रथमच थेट जनतेतून सरपंचाची निवड होणार असल्याने नागरिकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. सर्वसाधारण आरक्षणामुळे ही निवडणूक अधिक रंगतदार होणार हे मात्र निश्चित गावातील विकासकामे, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची दुरवस्था आदी मुद्दे यंदाच्या निवडणुकीत प्रमुख ठरणार आहेत. नव्या नेतृत्वाकडून ग्रामस्थांना ठोस आणि पारदर्शक कारभाराची अपेक्षा आहे.

महाळुंगे इंगळे ग्रामपंचायतीसाठी या वेळी होणाऱ्या निवडणुकीत सरपंचपद लोकनियुक्त असून ते सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित आहे. त्यामुळे गावातील विविध गटांकडून सरपंचपदासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत राजकीय दृष्टिकोनातून पाहता गावात सध्या तरी दोन प्रमुख गट असून दोघांमध्ये सत्तेची चुरस कायम असते. यंदा या दोन्ही गटांकडून आपापल्या उमेदवारांची जोरदार तयारी सुरू झाली आहे. तरुण नेतृत्वाला संधी द्यावी अशी मागणी देखील युवा वर्गातून उठू लागली आहे. तसेच जसजशी निवडणूक जवळ येईल त्यावेळी गट आणखी वाढणार का हे पाहणे औत्स्युक्याचे आहे.




### ही नावे सध्या चर्चेत

» राजकीय समीकरणे जुळवण्यासाठी वाड्या वस्त्यांवर भेटीगाठी घेताना दिसून येत आहेत. निवडणुकीला सहा महिने शिलक असूनही प्रथम लोकनियुक्त सरपंच पदासाठी नितीन तानाजी फलके, विद्यमान सदस्य मनोज चंद्रकांत इंगवले, राजेंद्र शामराव इंगळे, संतोष दत्तात्रय भोसले, लीलाधर तुपे, सुधीर भांगरे ही नावे आघाडीवर असून यात आणखी नावे भर पडणार आहेत.

### ग्रामस्थांची अपेक्षा

» ग्रामपंचायतीतील इतर सदस्यपदांबाबतही जोरदार रस्सीखेच सुरू आहे. प्रचाराची रणनीती, सोशल मीडियाचा वापर, प्रत्यक्ष जनसंपर्क यावर भर दिला जात आहे. गावातील महिलाही यंदाच्या निवडणुकीत सक्रीय सहभागी होण्याचे संकेत देत आहेत. एकूणच, महाळुंगे इंगळे ग्रामपंचायतीतील लोकनियुक्त सरपंचपदाची निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.